भारताच्या सुप्रिम कोर्टाचे सरन्यायाधीश मा. चंद्रचूड यांनी कोर्टरूममध्ये जीन्स घालून आलेल्या स्त्री क्लार्कला कोर्टरूमबाहेर जाण्यास सांगितले आणि साडी नेसूनच कोर्टरूममध्ये येण्याची तंबी दिली. यासंबंधात पुण्यातील स्त्रीमुक्ती आंदोलन संपर्क समिती, श्रमिक महिला समिती, पुरोगामी स्त्रीसंघटना, युवक क्रांती दल, एस्. एफ्. आय्., क्रांतिकारी महिला संघटना, सी. पी. एम् महिला आघाडी वगैरे संघटनांच्या वतीने त्यांना निषेधपत्र पाठविण्यात आले. त्यासंबंधीचा पत्रव्यवहार पुढे देत आहोत. आपल्या प्रतिक्रिया अवश्य कळवाव्यात.

— संपादक

**मा. यशवंतराव चंद्रचूड**
सरन्यायाधीश
सुप्रीम कोर्ट ऑफ इंडिया
दिल्ली.

**द्वारा सौदामिनी राव**
निमंत्रक, स्त्रीमुक्ती आंदोलन संपर्क समिती, पुणे
'निधी', ९७ प्रभात रोड, एरंडवणा, पुणे ४.
दि. १–९–१९८१

## विषय : स्त्रीच्या पोषाखस्वातंत्र्यावर गदा आणल्याबद्दलचा निषेध

२२ ऑगस्ट १९८१ च्या टाईम्स ऑफ इंडियामध्ये आणि २२ ऑगस्ट १९८१ च्या श्रमिक विचारमध्ये वाचलेल्या बातमीवरून असे समजते की सुप्रीम कोर्टरूममध्ये एका वकीलाबरोबर जीन्स घालून आलेल्या स्त्री–कारकूनाला आपण रूम बाहेर जाण्यास सांगितले आणि पुन्हां कोर्टात येताना साडी नेसूनच यावे अशी समज दिली. सोबत या बातम्यांची कात्रणे जोडत आहे.

भारतीय राज्यघटनेने पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांनाही सर्व बाबतींत समान हक्क दिले आहेत. पुरुषांप्रमाणेच स्त्रियांनाही पोषाख स्वातंत्र्य आहे. निरनिराळ्या धर्मांचे, निरनिराळ्या प्रदेशातील स्त्रीपुरुष निरनिराळे पोषाख घालतात. ते घालण्यास कायद्याने कोणतीही बंदी नाही. या पोषाखस्वातंत्र्याचा अर्थ अनिर्बंध पोषाखस्वातंत्र्य, उत्तान, औचित्यभंग करणारा किंवा हेतूपूर्वक शरीरप्रदर्शन करणारा पोषाख घालणे असा आम्ही करत नाही हे कृपया लक्षात घ्यावे.

कोर्टरुममध्ये कोणता पोषाख घालून यावा याबद्दल सुप्रीम कोर्टाचा कोणताही नियम नाही. बार कौन्सिलने कोर्टात घालावयाच्या पोषाखासंबंधी जो नियम केला आहे त्याप्रमाणे टाय बांधणे व काळा झगा (गाऊन) घालणे एवढाच पोषाख ठरवला आहे. पोषाख औचित्यपूर्ण (decent) असावा असे त्यात म्हटले असले तरी औचित्यपूर्ण म्हणजे काय ते ठरदलेले नाही. वकिलांनी अमूक एकच प्रकारचा पोषाख घालावा असा किंवा अशासारखा कोणताही कायदा नसावा असे आम्हाला वाटते. तसा कायदा नसेल